



'काय राव थट्टा करता गरिबाची!'
आता आम्ही असं नाही म्हणत.
तुम्हीच नाही का शिकवलं आम्हाला?
'नमस्कार मंडळी' म्हणायला!

अरे हो! ध्यानातच राहात नाही हां.
बरं काल काय वाचलंत?

ठकायमावशीच्या गोष्टी वाचल्या मी.
मी गुलबकावली वाचली!
'तोता मैना' तर काही विचारूच नका.

नका रे असलं काहीतरी वाचू.
चांगली पुस्तकं वाचीत जा!
काहीतरी डोक्याला, काळजाला भिडेल असं वाचा.
नुसती गंमत नको.
अशा शिदबा, दाजीबा, बाबाजी, सेवकराम,
यशवंता, जिवबा यांच्या गोष्टी वाचा.....

-असे आवाहन करीत, उमलत्या वयातील ग्रामीण भागातील मुलामुलींनाही आपलेसे करणारी ही कथा. कथेतील ग्रामीण वातावरण बोलके आहे. कथानकातील प्रादेशिक उल्लेखांसह पात्र-प्रसंग नवसाक्षरांना लेखन-वाचनास उद्युक्त करणारे आणि चालू जमान्याची माहिती देणारे ठरले. मूळच्या पुस्तकात बोलकी कथाचित्रे आहेत, त्यामुळे कथेतील चित्रण अगदी 'स्वभावोक्त' जमून गेले.



*बालमित्रांना रिझवीत रमवीत बोधकथा सांगणारे, कुमार आणि बालवाङ्मय दत्त आपटे यांनी लिहिले, त्याचा हा नमुना. ढवळे प्रकाशकांच्या वतीने प्रारंभपृष्ठावरील 'खूप वाचा, खूप शिका' या प्रेमळ सूचनेसह १९५४ साली ही पुस्तिका प्रकाशित झाली.*




# शिदबा धायगुड्या

'काळ्याचं पांढरं झालं, रानकाम करून दादा, अन् आता तुमचं लिवणं-पुसणं शिकून काय करायचं जी?' मला एका शेतकरी पेशाच्या गृहस्थाने वरील प्रश्न विचारला होता आणि तुम्हांपैकी सर्वांचाच हा सवाल असेल, नाही?

एका दृष्टीने खरं आहे तुमचं म्हणणं. लोक भाषणं ऐकवितात. हरिदास, पुराणिक कथापुराणं सांगून जातात. थकल्याभागल्यानंतर जिवाला एवढी करमणूक, माहिती झाली म्हणजे झालं! वर्तमानपत्रं, पुस्तकं वाचून काय करायचं आहे? आणि आतापर्यंत वाडवडील वाचत नव्हते म्हणून त्यांचं काय नडलं होतं? वर वर दिसायला हेही खरं आहे.

जमिनीची मशागत होते, पाऊसकाळ येतो, पेरण्या-कोळपण्या होतात, खळी पडतात, धान्य मळून घरी येतं. गुरंढोरं पाळली जातात, दूधदुभतं निघतं आणि असे हे सर्व व्यवहार कसे चोख चालले आहेत पिढ्यान्‌पिढ्या. यासाठी लिहितावाचता आलं नाही म्हणून कोणाचंच नडलं नाही.

त्याचं असं आहे, तुम्हाला वाटतं नडलं नाही. पण नडत होतं. आपलं नडत आहे हेच कळत नव्हतं, म्हणून नडत नाही असं वाटत होतं झालं.

तोंडी व्याजाचा दर एक, कर्जाच्या रकमेचा आकडा एक, लेखात व्याजाचा दरही निराळा आणि रकमेचा आकडाही निराळा. असं होत होतं की नाही? अशा हिशेबात तुमच्या जमिनी गेल्या आहेत का नाहीत?

हा झाला जुना जमाना. राव, मताला तरी जाता. नाव वाचायला येत नाही, म्हणून चित्रापुढे फुली करावी लागते ना? आणि फुली का करायची? निवडून का जायचं? निवडून तरी कुणाला द्यायचं? सांगा!

हा सांगतो म्हणून, हा जातवाला म्हणून, हा आमिष दाखवतो म्हणून, मत देता की नाही? आणि मग समदा घोळ झाला म्हणून हाकाटी करता की नाही?

लिहायला वाचायला यायला लागलं म्हणजे साऱ्याचा उलगडा होतो राव! मत देऊन निवडून आणलेली माणसं राज्य करतात आपल्यावर! मग राज्य करणारा माणूस कसा असावा, तो राज्यावर आल्यावर काय करणार आहे, याची सारी माहिती आपल्याला वाचायला मिळाली म्हणजे मग भीड पडत नाही. माणसं शहाणी झाली की राज्यकारभार सुधारतो. म्हणून 'लोकशाही' राज्यात माणूस शहाणा पाहिजे आणि लिहिण्यावाचण्यानं मनुष्य शहाणा होतो हे तरी खरं!

मग आता वय झालं म्हणून कसं भागेल? शेतीभातीत सुधारणा होत आहेत. एकाच एकरात पूर्वीच्या चार-पाच पट धान्य पिकविण्याच्या पद्धती निघाल्या आहेत. नवीन नवीन कायदे होत आहेत. सुधारणा होत आहेत. पण रोजच्या रोज ही सारी माहिती तुम्हाला येऊन सांगत बसणार

कोण?

तुमची संख्या तेहेतीस कोटिंच्या घरात. शिकलेली माणसं तीन कोटि. तीही आपापल्या पोटापाण्यामागे लागलेली. मग ती येणार केव्हा आणि माहिती देणार केव्हा? पण वरचे आकडे तरी कळले का? शिकलाच नाहीत राव न् काय? तेहेतीस कोटि, तेहेतीस हजार आणि तेहेतीस लक्ष समदंच सारखं!

बारा माणसांमागे अवघा एक माणूस शिकलेला आहे. अकरा अडाण्यात एक बारावा शहाणा! असा हिशेब सारा देशभर पसरलाय!

आता सांगा लोकांचं राज्य म्हणजे लोकशाही, होय की नाही? तुमच्या नेहरूंना, महात्मा गांधींना लोकशाही राज्य पसंत आहे. पण लोकशाही राज्य अडाणी राज्य होऊन चालेल का? माणसं शिकली, शहाणी झाली, तर त्या लोकांचं राज्य चांगलं राहील; का अडाण्यांचं?

मग राव शिका! शहाणे व्हा!! अन् वाचा तुमच्या दोस्ताची, ही शिदबा धायगुड्याची गोष्ट!!! पुस्तकांचा समुद्र पसरलाय् राव! रोज नवी माहिती. रोज नवी गंमत. शिकावं तेवढं थोडंच वाटतंय्, फायदा होतोय्. राम्! राम्!!

• • •

गोंद्या अंगणात पडलेल्या एका लाकडाच्या ओंडक्यावर उगीच बसला होता. धप् धप् करून भाकरी बडवून, थप् करून ती तव्यावर टाकणारी त्याची धाकटी बहीण काशी त्याला तेथून दिसत होती. चुलीजवळ फाटक्या वाकळीवर, हिवतापाने बेजार झालेली त्याची आई हातापायाचे मुटकुळे करून पडली होती. चुलीत कोंबलेल्या चिपाडांचा लालभडक जाळ छपरीत उजेड पाडीत होता. छपरीच्या दुसऱ्या टोकाला गंगी गाय डोळे मिटून रवंथ करीत बसली होती.

गोंद्याला वाटले गंगीच्या मिटल्या डोळ्यातून पाणी येत आहे. तिच्या कासेखालचे खोंड, त्याच्या बापाने - शिदबा धायगुड्याने - दोनच दिवसांपूर्वी शेजारगावच्या बाजारात कोणाला तरी विकून टाकले होते. त्यावेळी काशी मुळुमुळू रडली होती. गोंद्या आडवा आला होता. लक्ष्मी - त्याची आई - 'नग! नग जी!' म्हणून पडल्या पडल्या कळवळली होती; पण शिदबाने खेचून खोंड बाजाराला नेला होता आणि मग रात्री तो परत आला, तो झोंकाड्या खात व रुपये खुळ-खुळ वाजवीतच! बाजारातून येताना तो चांगली मोघाभर ताडी ठासूनच आला होता.

बसल्या बसल्या गोंद्याला हे सारे आठवत होते. अंधार दाटू लागला. समोरून जाणा-येणारी माणसे जनावरे सावल्या सरकल्याप्रमाणे दिसू लागली. कुट् कुट् करून एक भला मोठा उंदीर गोंद्या बसलेला ओंडकाच कुरतडू लागला, पण गोंद्याचे लक्षच त्याच्याकडे गेले नाही.

''काऽर ल्येका वाडुळ बसलायास?'' येसू पाटलाने जाता जाता त्याला हटकले; पण तरीही तो गप्पच बसला. आणि मग डुलत, झोंकाड्या खात, लावणीची तान सोडीत येणारा त्याचा बाप त्याला अंधुक अंधुक दिसू लागला. त्याच्या हातात कसले तरी टिकारणे होते आणि धोतराचा सोगा सुटला होता.

''का ऽ रं ऽ भडविऽच्या, असा का जंगमाच्या मुड्यावानी बसलायास?' शिदबाने जवळ येताच बोबड्या शब्दांनी पोराला टाफरले. त्याच्या तोंडाला आंबूस घाण येत होती. ताडीबरोबर चघळलेल्या आखख्या मिरच्याभज्यांनी त्याची जीभ हुळहुळत होती.

'ऊ ऽ इ ऽऽ क्!' त्याने एक जोरात उचकी दिली आणि गोंद्याच्या नाकात ताडीची आंबूस घाण शिरली. पोरगा धडपडून ओंडक्यावरून उठला आणि छपरीकडे धावला. शिदबाच्या आरडण्याने लक्ष्मी खडबडून उठली व कुडाला टेकून कपाळाला हात लावून बसली. गंगीने डोळे उघडून शिदबाकडे एकदा मारक्या नजरेने पाहिले. आणि मग कारण नसताना शिदबाने खणाखणी मांडली! टिकारण्याने काशी-गोंद्याला धोपाटी घातल्या. पोरांच्या आरडण्याने गाव गोळा झाले. 'योऽ भाड्या पोराबाळांचं वाटोळं करणार!' म्हातारी जाधवीण उसळून म्हणाली.

शिदबा धायगुड्याचे शेत म्हणजे, एका टेकडीच्या पायथ्याशी, रेलगाडीच्या रुळालगत असलेला जमिनीचा एक लहानसा तिकोणी तुकडा होता. शेताच्या एका

कोपऱ्यात तारेचा एक लोखंडी खांब उभा होता. खांबावर असलेल्या तारांमधून पुण्या-मुंबईची माणसे एकमेकांशी बोलतात, असे येश्या पाटलाने काशी-गोंद्याला सांगितले होते. काशी या खांबाला कान लावून हे बोलणे ऐकण्याचा प्रयत्न करी पण तिला नुसता सऽळ् सऽळ् असा आवाज ऐकू येई. गोंद्या फार करामती! तो खांबावर चढून पालथ्या कपाला गुंडाळलेल्या तारांनाच कान लावण्याचा प्रयत्न करी; त्यालाही गुंऽईऽ आवाजापलीकडे शहरगावच्या माणसांचे काहीच बोलणे ऐकावयास मिळत नसे.

गंगी शेतांतील गवत कुरतडीत हिंडता हिंडता या पोरांकडे अधून मधून पाही. तिचे, तिला राखुळीला आणणाऱ्या या पोरांवर फार प्रेम होते. शिदबा सारे दूध पिळून घेऊन, तिच्या वासराची उपासमार करील म्हणून काशी, नाही तर गोंद्या हळूच वासरू सोडून देत व ते हुंदाड्या देत पिऊ लागले म्हणजे मजेने पाहात बसत. गंगीला हे आठवले म्हणजे ती कौतुकाने त्यांच्याकडे येई व प्रेमाने त्यांना ढुशा मारी. त्यांच्या अंगावर मान घाशी.

कित्येक वेळा ती चरणे सोडून बसकण मारून डोळे मिटून विचार करीत बसे. पोरे तिच्या राखणीला असत. ती रुळावर जाईल म्हणून त्यांना भीती वाटे; कारण टेकडीच्या पोटास असलेल्या भगदाडांतून फोंऽऽ करीत येणारा तो प्रचंड लोखंडी सर्प शेताजवळून जेव्हा धाड् धाड् करीत जाई तेव्हा त्यांनासुद्धा भीतीने हादरा बसे. गंगीने पहिल्या दिवशी टुण्कन उडी मारून शेतभर केलेली धावपळ त्यांना आठवे. बरे तर बरे, रुळाकडेला तार होती, नाहीतर गंगी केव्हाच त्या धुडाखाली सापडायची!

आता तिला काय नि काशी-गोंद्याला काय सवय झाली होती. गंगी आता खुशाल गाडीकडे पाहात बसे. खिडक्यांखिडक्यांतून तोंडे काढून बसलेले रंगीबेरंगी स्त्री-पुरुष काशी-गोंद्याला बाहुल्यांप्रमाणे वाटत. त्यांना वेडावण दाखविण्याचा मोह त्यांना होई पण छाती मात्र होत नसे त्यांची तसे करण्यास. ही गाडी आपला लोखंडी रस्ता सोडून इकडे तिकडे जात नाही, ही आता तिघांचीही खात्री झाली होती. त्यामुळे कित्येक वेळा अगदी लगत उभे राहून ते तिची मजा पाहात.

नेहमीप्रमाणे ही तिघेही आज शेतावर आली होती. ऐन दुपारचे ऊन झगमगत होते. बाभळीच्या झुडपाझुडपांत दडलेले रातकिडे कीऽऽर्र असा कर्कश आवाज घुमवीत होते. सावलीला काशी-गोंद्याने न्याहरीचे फडके सोडले व जवळच बसलेल्या गंगीच्या पुढ्यात भाकरीचा एक कोरका फेकला. सायंकाळ झाली. सावल्या लांबल्या आणि गंगीने घराची वाट धरली. पोरेही फुपाटा उडवीत तिच्या मागून चालू लागली.

घरची वाट धरताना पोरांची पावले जड झाली. आईला कडू गोळ्यांचे औषध आणण्यासाठी बापाने सकाळी आपणास चवली दिली नाही याची याद गोंद्याला आली. कोरड्यास तिखट झाले म्हणून आपणास पिटल्याची काशीला आठवण झाली, पण बोलले नाही कोणीच! तिघेही पाय ओढीत घरी चालली होती.

शिदबाच्या बोटभर शेतात पोट न भरल्याने गंगीने एकदा पाटलाच्या शेतात मुसंडी मारली होती; पण येशाने तिला बदाड बदाड बदडले होते. तिची पाठ दोन दिवस हुळहुळत होती. काशी-गोंद्याने तिला खूप आंजारले गोंजारले. येशाला शिव्या घातल्या पण उपयोग काय?

आपला मालक दूध पिळतो पण वैरणकाडीची सोय पाहात नाही, याबद्दल तिला मनस्वी राग येई. पोवळ्या खोंडाची आठवण झाली म्हणजे ती कावरीबावरी होई, ती शिदबावर चिडे पण बोलून चालून मुके जनावर. करणार काय ती बिचारी? अशा या तंद्रीतच कडमडत ती तिघेही छपरीजवळ येऊन पोचली. छपरात अंधार होता. चिमणीत तेल नव्हते. दिवळीत अगीनकाडीची रिकामी पेटी होती. गोंद्याने गंगीला अंधारातच धडपडून दावे लावले. काशीने जाधविणीकडून, शेणकुटावरून दोन निखारे आणले.

चगळ, चोथा, काटकुट्या, चिपाडे गोळा करून तिने चूल पेटवली. चुलीच्या जाळाच्या उजेडात, मुटकुळे करून पडलेली लक्ष्मी तिला दिसली.

''येऽ आऽईऽ'' करून काशीने तिला हाक मारली. ''वाऽईच पानी द्येऽग'' लक्ष्मी इवळत म्हणाली. काशीने तिला पाणी दिले आणि शिदबा सैतानासारखा मुजोरी करीतच घरी आला. शिदबा धायगुड्याला वाटे, आपले दैवच उफराटे आहे. शेजाऱ्यांची शेते पिकत पण याची जमीन दड्ड, हरळी तरवडाने बुजबुजलेली. शेजाऱ्यांच्या

गोठ्यात गुरेढोरे हंबरत तर त्याच्या छपरात असलेल्या दोन शेपटातले एक खोंडच त्याला गमवावे लागले आणि राहिलेली गंगी गाय उपासमार होऊन भाकड बनत चालली. बायकोने अंथरूण धरले, तर पोरे चिंध्या गाळीत दीनवाणी भटकू लागली.

नवटाक, दोन नवटाक ताडीसाठी चार दिडक्या मिळण्याची त्याला मारामार पडू लागली. तशात सरकारी कायद्याने तर त्याच्या कपाळात दगड पडला. चोरटी ताडी फारच महाग पडू लागली. त्याला वाटे लोक 'ताडी पितो' म्हणून उगीच बोंब टाकतात आपल्या नावाने. तो दैवावर चिडला, सरकारवर चिडला आणि गावकऱ्यांवरही चिडला. ''यांच्या बाऽने पैशे मोजल्यात! पेऽनार! पेऽनार! मी काऽय बी पेनार!' असे बडबडून तो साऱ्यांवर खंडा केल्याच्या फुशारकीत घरी येई.

तांबेरलेले डोळे घेऊन शिदू धायगुड्या छपरात विडी ओढीत बसला होता. त्याच्या डोक्यात कसला तरी विचार चालला होता. थोड्या वेळाने तो उठला व न बोलताच चालू लागला. पोरे जागी झाली आणि बाप घरी नसल्याचे पाहून जरा चरकली! बाप इतक्या लौकर उठून बाहेर पडल्याचे त्यांनी एकदाच पाहिले होते आणि त्यानंतर दोनच दिवसात पवळ्या खोंड नाहीसा केला होता त्याने! आज ही दुसरी खेप होती.

काशी-गोंद्याला चिंता लागली, ती दोघेही ओढ्याकडे गेली. ती परत आली तेव्हा शिदू हशम्याबरोबर बोलत होता. पोरांना बघताच दोघांनीही आपली थोबाडे बंद केली. थोड्या वेळाने हशम्या परत जाण्यास निघाला. त्याने पचकन् एक लालभडक गुळणा काशीने सारवून नितळ केलेल्या जमिनीवर टाकला व जाकिटांतून एक भडक रंगाचे फडके काढून तोंड पुसले. हशम्या मुलाण्याचे रामपाऱ्यातील आगमन लक्ष्मीला अशुभ वाटले. तिचा आजाराने काळवंडलेला चेहेरा अधिकच काळवंडला.

शनिवारचा दिवस होता. शिदबा पोरे उठण्याच्या आधीच सकाळी लौकर उठला व गंगीला घेऊन 'हैक! हैक!!' करीत बाहेर पडला. पोरे उठली. त्यांना छपरीत शिदबा दिसला नाही. गंगी दिसली नाही. ती बिचकली. आखा दिवस चिमणीसारखी बारीक तोंडे करून बसून राहिली.

संध्याकाळी शिदबा परत आला. त्याचा चेहेरा भडकला होता. अंग धुळीने भरले होते. गंगीही हैराण होऊन त्याच्याबरोबर परत आली होती. तिची चांगलीच कावड निघालेली दिसत होती. शिदबा वळवळत होता पण बोलत नव्हता. आपण कोठे गेलो होतो, का गेलो होतो, याचा थांगपत्ताही लागू देण्यास तो तयार नव्हता. पोरांना काहीतरी शंका आली आणि त्यांचा जीव कासावीस झाला.

शिदबाने गाय बाजारात नेली होती, पण ती विकली गेली नव्हती. शेतकऱ्यांपैकी ती कोणीच घेतली नाही, कारण शिदबाने सांगितलेली किंमत त्यांपैकी कोणालाच पटली नाही. खाटकांनी किंमत देऊ केली, पण खाटकाला विकण्याची छाती शिदबाला झाली नाही. हशम्याने खूप मध्यस्थी केली. पण शिदबाला धाडस झाले नाही. तरी हशम्याने दोन रुपये इसारत कोंबलीच त्याच्या हातात. येताना रामोशांच्या वस्तीवर शिदबा ते रुपये घालवून काहीसे पिऊन आला होता.

काशीने आणि गोंद्याने मात्र हाय खाल्ली त्या दिवसापासून! गंगीबद्दल त्यांना काळजीही वाटू लागली. कोणत्याही घटकेला गंगी नाहीशी होईल या धास्तीने पोरे भेदरून गेली. दोन दिवस झाले. शिदबा वारंवार भडकू लागला. संध्याकाळी वळवळ करू लागला. भरपूर पैसे मोजल्याशिवाय त्याला चोरून ताडी देण्यास कोणी तयार नव्हते! तो भांडण काढू लागला, पोरांना ठोकाठोकी करू लागला, मध्ये पडणाऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना आईबहिणीवरून शिव्या घालू लागला. शनिवारची वाट पाहू लागला.

पण शुक्रवारीच हशम्या मुलाणी, एका खाटकाला घेऊन त्याच्या दारी आला. हशम्याच्या मध्यस्थीने कुजबूज होऊन सौदा बरा ठरला. संध्याकाळी चिकार ताडी पिण्यास मिळण्याची आशा शिदबाला वाटू लागली. भुकेने वखवखलेल्या पोरांना गोडधोड खाऊ घालण्याच्या लंब्या बाता तो मारू लागला. गंगीचा सौदा पटविण्याचा त्याने निश्चय केला.

काशी-गोंद्या रडू लागली. रोजगारास जाऊन पोटाला

मिळविण्याची भाषा करू लागली. लक्ष्मी काहीच बोलली नाही पण तिच्या डोळ्यातून पाणी झिरपू लागले. गंगी कावरी बावरी होऊन पाहात होती.

''रडाया काऽय झालं गं ऽ दाल्ला म्येला नाऽय अझून!'' शिदबाने लक्ष्मीला तडकावले.

''खायाला कार झालीया ही भाकड गाय अन् पैकाबी चांगला येतुया!'' हशम्याने साळसूदपणाने सुचविले.

''मला नगं ही घासाघीस. च्याऽयला ह्यो हाडाचामड्याचा ढीग घेऊन पैका गिनायचा आणि ही बोंबाबोंब ऐकायची. माझं इसारतीचं पैसं टाक हशम्या; मी जातो कसा!'' खाटीक तुमान सावरीत जाण्याचा आव आणून म्हणाला.

आणि शिदबा धायगुड्या पिसाळला. त्याने तोंड सोडले. बायका-पोरांचा उद्धार केला व शेवटी तो चेकाळून ओरडला, ''इकनार! इकनार! कोन भडविऽचा मला अडवतुया त्येच बघतोऽ! तंगडीच तोडतो एक्येकाची!''

खाटकाला अवसान आले. त्याने बेगुमानपणाने पुढे होऊन गंगीचे दावे सोडले. तिला ओढ खाताना पाहून हशम्याने तिच्या पाठीत दोन-चार धोपाट्या घातल्या. ''तटतीऽया सटवी!'' तांबडा गुळणा टाकून तो म्हणाला.

काशीने गंगीच्या गळ्याला मिठी मारली. ताडकन् शिदबाने तिला एक टिकारणे हाणले. पोरगी कासावीस झाली. गंगेऽ गंगेऽऽ' करीत गोंद्या आडवा आला. त्यालाही शिदबाने बकोटीला धरून एक टोला घातला. पोरे धाय मोकलून रडू लागली. गंगी, हशम्या, शिदबा, तो खाटीक असे सारे लटांबर निघाले. दूर दूर जाऊ लागले आणि बारीक बारीक होत होत शेवटी बाजारगावच्या वाटेवर दिसेनासे झाले.

पोरांनी मुटकुळे करून स्फुंदत पडलेल्या लक्ष्मीच्या अंगावर घालून घेतले व हमसा-हमशी रडण्यास सुरुवात केली.

शिदबा रात्री परत आला तो टेऽर बनूनच. येताच भाकर तुकडा न खाता पेंगळून पडलेल्या बायकोपोरांना त्याने धारेवर धरले, मारपीट केली. ''अऽक्षी दमून आऽलो तर जेऽवाण तयार नाही!'' त्याने तक्रार केली.

धायगुड्याची पोरे सकाळी लौकर उठली; पण छपरात त्यांची गंगी गाय कोठे होती? वाईट तोंडे करून ती बाहेर पडली व शेताकडे जाऊ लागली. आपण आज शेताकडे का जातो आहोत हेच त्यांना कळेना!

''वाइच सरमाड गोळा करून आणाऽऽ रेऽ पोरांनो!'' नुकताच उठलेला शिदबा तांबरलेल्या डोळ्यांनी पोरांकडे पाहात ओरडला.

काशी-गोंद्या खाली माना घालून मुकाटवाणी चालू लागली आणि वाटेत त्यांना हशम्या मुलाणी आडवा आला.

''हशमसाब, गंगी कुटाऽय व्ह?'' काशीने त्याला कळवळून विचारले.

''गंगी व्हय? अगीन गाडीत बसून म्हमईला गेली जणू!''

''कशाऽपाई?'' गोंद्याने आऽ वासून आश्चर्याने विचारले.

''साऽयबाच्या पोटात ऱ्हायाला रऽ! तुझ्या बाऽला ताडी पेयाला हवी नव्हं?'' खीऽखी हसून हशम्या मुलाणी म्हणाला. पोरांचे काळीजच फाटले. डोळे पुशीत पुशीत त्यांनी शेताचा रस्ता धरला.

गोंद्या तारेच्या खांबाच्या तळाशी उताणा पडला होता. तोंडावर बडवणाऱ्या उन्हाच्या चपाट्याची त्याला फिकीर नव्हती. पुण्या-मुंबईची माणसे तारांतून एकमेकांशी बोलत होती. पण ते बोलणे ऐकण्यासाठी गोंद्या खांबावर चढला नाही की काशीने खांबाला कान दिला नाही. त्यांच्या नजरा शेतभर फिरत होत्या, पण त्यात चरणारी गंगी त्यांना कोठेच दिसत नव्हती. त्यांनी जळणकाटूक गोळाच केले नाही.

''गंऽगेऽऽ!'' काशीने हंबरडा फोडला.

गोंद्या चमकून कुशीवर वळला व तिच्याकडे पाहू लागला.

इतक्यात फोंऽऽऽ करीत टेकडीच्या पोटातून लोखंडी साप बाहेर आला. गाडीला सारेच उघडे लोखंडी डबे होते. त्यांतून ठेचून गुरे भरलेली होती. त्यात साहेब नव्हते, मडमा नव्हत्या, रंगीबेरंगी माणसे नव्हती.

गोंद्या ताडकन् उभा राहिला. काशीही उभी राहिली. त्यांना वाटले, या जनावरांच्या दाटीत आपली गंगी गाय उभी आहे. त्यांच्या नजरा घारीसारख्या भिरभिरू लागल्या. डब्यांतून गायी, म्हशी, बैल केविलवाण्या भकास मुद्रेने दाटीवाटीने उभे होते.

''गंगेऽऽअऽ!'' काशीने हाक दिली.

''गंगेऽगेऽऽअऽ!'' गोंद्याने टाहो फोडला.

खट् कड् खट् कड् करीत गाडी चाललीच होती, ती उभीच राहीना. सारी जनावरे त्या लोखंडी सापळ्यात सापडून चालली होती. काशीला गाडीचा राग आला.

''थूऽ थूऽऽ रांड!'' ती गाडीकडे पाहात रागाने थुंकली. गोंद्याला म्हमईच्या साहेबांचा भयंकर राग आला. ''थूऽ ल्येकांनो!'' तो मुठी वळून ओरडला. त्याने दात ओठ खात एक दगड गाडीवर भिरकावला आणि त्याचे सर्व अंग लुळे पडले. भांऽऽ करून त्याने भोकाड पसरले व नित्राण होऊन धाडकन् तो मातीत कोसळला.

काशी फाटक्या परकराने डोळे पुशीत त्याच्याजवळ बसली. संध्याकाळी ती तशीच हात हलवीत घरी परतली. पोरे घराकडे आली. दारापुढे ही गर्दी होती! तीत हशम्या होता, काल आलेला त्याचा दोस्त तो कसाई होता. येश्या पाटलाचा बाप बाळा पाटील होता. एक शिपाईही होता आणि शेजारीपाजारीही होते.

शिदबा खाली मान घालून शरमून बसला होता. ''हाणा दोन जोडं मुडद्याला!'' जाधवीण कडाडत होती. पोरे बावचळली. त्यांना काही कळेना. ती कावरी बावरी होऊन इकडे तिकडेपाहू लागली. आणि छपरीत त्यांना दाव्याला बांधलेली गंगी दिसली. ''गंगेऽ'' करून त्यांनी छपराकडे धाव घेतली व तिच्या गळ्याला मिठी मारली. गंगी त्यांना प्रेमाने चाटू लागली.

त्याचे असे झाले होते. बाळा पाटलाने शिदबाची गंगी तालुक्याच्या गावात ओळखली. तरणी गाय खाटकाकडे पाहून त्याला शंका आली. त्याने खाटकाला हटकले व चौकी दाखविली.

पोलिस पाटलानेच हे लटांबर आणल्याने फौजदाराने खाटकाला दम भरला व गाय परत करण्यास सांगितले. एक पोलिस शिपाईही बरोबर दिला व हे सारे प्रकरण शिदबाच्या घरापुढे हजर झाले.

''काऽर मुलाण्या, ही एजंटी करतोस व्हय? सुडकाळीच्या पांढरीभैर काढून लावीन!'' बाळा पाटलाने हशम्याला दम दिला.

''नाय बा, शिदबा इकायची मंगाला म्हनून मी त्याला गिऱ्हाइक दावलं.'' हशम्या साजूकपणे म्हणाला. आणि मग सतरा जणांची सतरा तोंडे वाजू लागली. खाटकाने, दिलेल्या पैशाची आशा सोडून हळूच चोरपावलाने सूंऽबाल्या केला.

रात्री आठला मारुतीच्या देवळात बाळा पाटलाने पंच कमिटी बोलावली आणि हशम्याला व शिदबाला हजर राहाण्यास फर्मावले व मंडळी पांगली. गंगी परत आल्याने पोरे हुराळली होती. लक्ष्मीचा चेहेरा उजळला होता.

मारुतीच्या देवळापुढे एक पिंपरीचे झाड होते. भोवती पार होता. रात्री गावकरी या पारावर बसून बिड्या पीत. पानतंबाखूचा फडशा पाडीत आणि थट्टामस्करी करीत. पांड्या गुरव त्यांना तबलाही ऐकवी कधी कधी आणि कळत नसून ही मंडळी त्याचे धा कीट धाऽ मान डोलवीत ऐकत.

चव्हाणाचा शिरप्या जरा 'शर'गावचं पाणी प्याला होता. तो एखाद्या वेळी म्हणे, ''पांडबा शई झडलीया जणू, यो तबला वाजतुया का डफ वाजतुया त्येच कळत नाय!''

रोजच्याप्रमाणे आजही हा फड जमला पण आज गप्पांना शिदबाचा विषय होता. आणखी थोडक्या वेळात पंचकमिटी भरणार होती. पांड्या गुरव ठाणवाईत दिवा लावून देवळाची झाडलोट करीत होता. बैठकीची सोय लावीत होता. पुनवेचा चांद चांगला कासराभर वर चढल्यावर बैठक जमली. हशम्या आणि शिदबा चोरासारखे उभे होते.

''शिदबा, तुझे ख्वांड कुटाय?'' पाटलाने विचारले.

''ढेबेवाडीच्या पाटलाकडे!'' शिदबाने अवसानात उत्तर दिले.

''सांगावा देऊन इचारू का?'' म्हातारा रामा न्हावी म्हणाला.

''अन् नग कुनी म्हणलया!'' शिदबा जोरात होता.

''हाय जणू ततं!'' कोणीसे म्हणाले आणि शिदबा शेर बनून इकडे तिकडे पाहू लागला.

''गंगी गाय कशापायी विकली व्हतीस?''

''पैक्यापाई!''

''नशापाणी करतोस होय? सरकारी कायदा माहीत नाही तुला?'' मास्तरांनी खडसावले.

''कोन म्हनतया?''

''म्हाताऱ्या जाधविणीला बोलावू का?'' मास्तरनी खडसावले आणि शिदबा चूप झाला.

''अन् तूं र हशम्या, गावची जनावरं काढून लावतुयास व्हय?'' पाटलांनी हशम्याला हटकले.

''नाऽय बा! माज्या गोठ्यात गुरंढोरं हैत! गायबी हाय, पोरंबाळं दूध पित्यात अन् मी कशापाई असला वंगाळ धंदा करू जी?'' हशम्याने आपली बाजू मांडली.

''काय सुकाळीचा गोड बोलतुया!'' कोणीतरी म्हणाले.

''शिदबा, तू नशापाणी करतोस! शेताकडे, बायकोपोरांकडे, आपल्या जनावरांकडे तुझं लक्ष नाही. तू गावची अब्रू खराब करतोस असं आमचं म्हणणं आहे.'' मास्तरनी सुनावले.

''हशम्या, तू आपली गुरंढोरं सांभाळून आहेस, पण शिदबाच्या गायीचा सौदा ठरवून चार पैसे मिळविण्याचा तुझा बेत होता. तुझ्यामुळे त्याला नशापाणी करण्यास सवड मिळाली असं आमचं म्हणणं आहे.'' मास्तरनी हशम्याला चमकावले.

''देवांनी कसूर माफ करावी एकबार!'' हशम्या खाका वर करून मोकळा झाला आणि मग शिदबाचेही अवसान ढासळले. पंचांनी थोडा वेळ चर्चा केली आणि मग मास्तरांनी पंचांचा निकाल सांगितला.

''शिदबा, मृगाला दोन महिने अवकाश आहे. तेवढ्या वेळात रेलगाडीकडची तुझी जमीन झाडून स्वच्छ झाली पाहिजे. हरळी, तरवड साफ निघून, नांगर-कुळव फिरून जमीन लोण्यासारखी मऊ पडली पाहिजे. हशम्याने त्याला कुळव, काठी, बैल यांची मदत केली पाहिजे. पंचांनी जमीन नापास केली तर दोघांनाही गावकरी मंडळी आपल्यात घेणार नाहीत. त्यांनी आपली आपली सोय पाहावी. शिदबाने नशापाणी केल्यासही हशम्या जामीन!'' आणि मग पंचमंडळी उठली.

शिदबापेक्षा हशम्याने हाय खाल्ली. त्याने दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच शिदबाला ताणून धरले. ''अर एऽ पोरांनो! बा संगट चला की शेतावर!'' त्याने काशी गोंद्याला सुनावले. शिदबा, हशम्या व पोरे शेताकडे गेली. लक्ष्मीला आनंद वाटला. खूपखूप बरे वाटले आणि मग जमिनीला तेज चढू लागले, तशी शिदबाला ईर्ष्या आली.

पोरांनी हशम्या मुलाण्याला 'हशम मामा!' म्हणावयास सुरुवात केली. मास्तरनी शिदबाला, लक्ष्मीला तालुक्याच्या गावी डॉक्टरला दाखवून आणण्यास सांगितले आणि शिदबानेही ते तत्काळ ऐकले.

लक्ष्मीला औषधपाणी मिळू लागताच ती सुधारली. हिंडू-फिरू लागली. घरकाम पाहू लागली. आणि एक दिवस बाळा पाटलाने शिदबाची जमीन 'फास' असल्याचे जाहीर केले.

मृगाच्या सरी कोसळू लागल्या. आणि हस्ताचा पाऊस गड् गड् करीत आला व ताड् ताड् जमीन झोडपून निघून गेला. दसऱ्याच्या महिन्यातील कोवळी उन्हे शिदबाच्या हिरव्यागार रानावर चमकू लागली.

''अवंदा गंगी खोंड देतीया जणू!'' शिदबा तिच्याकडे पाहून म्हणे ''बरं व्हईल. घरचं जनावर व्हईल शेतकामाला!' लक्ष्मी म्हणे आणि हा संवाद ऐकणारी काशी-गोंद्या ही बातमी ऐकून खूश होऊन जात.

दिवाळीच्या आदल्या रात्री लामणदिवा घेऊन म्हारीण गंगीच्या गोठ्यात आली व तिला हळदकुंकू लावून 'इडापिडा टळो' करून ओवाळून गेली. ''पाडव्याला दुपारचं येऊन जाऽगऽ!'' म्हणून लक्ष्मीने तिला बजावले.

दिवाळी दिवशी ठणक् ठणक् टाळ वाजवीत वासुदेव आले व त्यांनी शिदबाच्या अंगणात फेर धरून बळीचे राज्य आल्याची वर्दी दिली. त्याच्या उंच टोकदार टोप्यात मोरपिसे खोवली होती. भोवती छोटे छोटे आरसे बसविले होते. फेऱ्या मारत असताना त्यांचे लांब पांढरे झगे वाऱ्याने फुगत होते. काशी-गोंद्या ही मौज पाहात उभी होती.

''त्यांना शिदा द्या जी!'' लक्ष्मीने शिदबाला सांगितले. शिदबाने नुकतीच आंघोळ आटोपली होती. गळ्यातील ओली तुळशीमाळ चाचपीत तो लगबगीने पुढे आला. एका सुपात हरबऱ्याची डाळ व गुळाचा खडा घेऊन तो पुढे आला. ''वर्साची फेरी आली जणू देवा?' असे म्हणत त्याने ते भरले सूप वासुदेवाच्या झोळीत ओतले.

''बळीचं राज होवो! धन्याला बरकत येवो!!'' असा गिल्ला करून वासुदेव ठणक् ठणक् करीत चालू लागले. काशी-गोंद्या त्याच्याकडे बघत उभे राहिले.

●●●